१४ एप्रिल विशेषांक...

# गौरव प्रकाशन

RNI NO. MAHMAR/210/35320 | संपादक : बंडूकुमार धवणे | Postal Reg. No. ATI/RNP/259/2022-2024

वर्ष १५ ◆ अंक १ ◆ अमरावती ◆ दि. १४ एप्रिल २०२४ ◆ पृष्ठ ४ ◆ किंमत २ ₹ ◆ Email: gauravprakashan1@gmail.com

## विनम्र अभिवादन



थोर समाजसुधारक महात्मा जोतिराव फुले जयंती व विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती दिनानिमित्त विनम्र अभिवादन –संपादक

# आम्ही अदानींचे नव्हे शेतकरी, गरिबांचे सरकार चालवणार

## भंडाऱ्यात राहुल गांधींचा मोदींवर हल्लाबोल

भंडारा : मी माझ्या यात्रेदरम्यान लाखो शेतकऱ्यांशी संवाद साधला. अरबपतींचे कर्ज माफ होतात, पण आमचे कर्ज माफ का होत नाही? असा सवाल शेतकऱ्यांनी केला. या देशातील शेतकऱ्यांसमोर आजही अनेक समस्या आहेत. त्यामुळे आमचे सरकार येताच सर्वप्रथम देशातील सर्व शेतकऱ्यांचे कर्ज माफ करणार. एमएसपी, जातीनिहाय जनगणना आणि ३० लाख सरकारी नोकरभरती

केली जाईल. ही काँग्रेसची गॅरंटी आहे, अशी ग्वाही काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी दिली. ते भंडारा जिल्ह्यातील साकोली येथे बोलत होते.

राहुल गांधी म्हणाले की, आम्ही जे घोषणापत्र तयार केले, ते बंद खोलीत नव्हे तर देशातील हजारो लोकांकडून, शेतकरी, कामगार, बेरोजगार, महिलांसोबत चर्चा करून तयार करण्यात आलेले आहे. हे काँग्रेस पक्षाचे घोषणापत्र नसून जनतेचे घोषणापत्र आहे. आपल्या मनातील गोष्ट आम्ही येथे लिहून ठेवल्याचा उल्लेख त्यांनी केला. कोरोना काळात पंतप्रधान थाळी वाजवण्याचे व मोबाईलचे लाईट लावण्याचे काम करत होते. पंतप्रधान मोदी म्हणतात मी ओबीसी आहे; परंतु ओबीसी



समाजाकडे त्यांचे लक्ष नाही. या देशात जेवढी लोकसंख्या आदिवासी, दलित, ओबीसींची आहे, त्यांच्या वाट्याला त्या प्रमाणात लाभ मिळत नाही. त्यांना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधित्व देण्याचे काम आमचे सरकार करणार आहे. राहुल गांधी म्हणाले, आमचे सरकार येताच अग्निवीर योजना रद्द केली जाईल. आम्हाला दोन प्रकारचे शहीद नकोत.

ही योजना आर्मीने तयार केली नसून पंतप्रधान कार्यालयाने तयार केलेली योजना आहे. लघुउद्योगावर लावलेला जीएसटी रद्द करणार, एकच टॅक्स प्रणाली राहणार. शेतकरी वर्गावरही लादलेला १८ टक्के जीएसटी आम्ही रद्द करणार, गरीब कुटुंबातील एका महिलेला दरवर्षी एक लाख रुपये देणार, तरुणांसाठी अप्रेंटिस योजना लागू करणार, सरकार नोकरीभरती खासगी नव्हे, तर सरकारी यंत्रणेमार्फत राबवणार असल्याचे ते म्हणाले. यावेळी मंचावर काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, काँग्रेसचे नेते बाळासाहेब थोरात, विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, खासदार चंद्रकांत हंडोरे, माजी आमदार माणिकराव ठाकरे, आमदार अभिजीत वंजारी, पूर्व विदर्भातील महाविकास आघाडीचे उमेदवार डॉ. प्रशांत पडोळे, आमदार विकास ठाकरे, नामदेव किरसान, प्रतिभा धानोरकर आदी मान्यवर उपस्थित होते.

## सुषमा अंधारेंविरुध्द निवडणूक आयोगाकडे तक्रार

मुंबई : दोनच दिवसांपूर्वी वर्ध्याचे खासदार आणि महायुतीचे उमेदवार



रामदास तडस यांच्या सूनबाई पूजा तडस यांनी पत्रकार परिषद घेत अनेक आरोप केले होते. हे प्रकरण ताजे असतानाच याच प्रकरणी पत्रकार परिषदेतील एका गोष्टीवर राज्य बालहक्क संरक्षण आयोगाने आक्षेप घेतला आहे. त्यामुळे शिवसेना ठाकरे गटाच्या उपनेत्या उपनेत्या सुषमा अंधारे या अडचणीत आल्या आहेत. या प्रकरणात राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाच्या अध्यक्षांनी केंद्रीय आणि राज्य निवडणूक आयुक्तांना पत्र लिहले आहे. त्यामध्ये सुषमा अंधारे यांच्यावर कारवाई करण्याची मागणी केली आहे.सुषमा अंधारे यांनी पूजा तडस यांच्यासोबत पत्रकार परिषद घेतली होती. यावेळी पूजा तडस यांच्या १७ महिन्यांच्या मुलालाही पत्रकार परिषदेत आणण्यात आले होते. यावर राज्य बालहक्क संरक्षण आयोगाने आक्षेप घेतले आहेत. या प्रकरणी आयोगाच्या आयुक्तांनी अंधारे यांच्या विरोधात थेट निवडणूक आयोगाकडे तक्रार केली आहे. तसेच लहान मुलाला अशा पद्धतीने पत्रकार परिषदेत आणून लहान मुलाचा वापर प्रचारात केल्याबद्दल सुषमा अंधारे यांच्यावर कारवाई करण्याची मागणी राज्य बालहक्क संरक्षण आयोगाच्या आयुक्तांनी केली आहे. राज्य बालहक्क संरक्षण आयोगाच्या अध्यक्षा ॲड. सुशीबेन शहा यांनी या प्रकरणाची दखल घेत केंद्रीय निवडणूक आयोगाचे मुख्य निवडणूक अधिकारी राजीव कुमार आणि राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्किंलगम यांना पत्र लिहिले आहे.









काय करूं आतां धरूनिया भीड । नि:शंक हे तोंड वाजविले ।।
नव्हे जगीं कोणी । मुकीयांचा जाण सार्थक लाजून नव्हे हित ।।

कोणतीही चळवळ यशस्वी होण्यासाठी तिला वर्तमानपत्राची आवश्यकता असते. ज्या चळवळीचे वर्तमानपत्र नसेल तिची अवस्था पंख तुटलेल्या पक्ष्याप्रमाणे होते. – डॉ. बाबासाहेब आंबेडकर

## विरोधकांचे भरकटलेले जहाज

*देशाच्या कानाकोपऱ्यांत लोकसभेच्या निवडणुकीचा ज्वर चढलेला पाहावयास मिळत आहे. सत्ताधारी भाजपा व त्यांचे मित्रपक्ष आणि काँग्रेसच्या पुढाकारातून बनलेली इंडिया आघाडी निवडणुकीत आक्रमकपणे सहभागी झालेली आहे तसेच कुंपणावरचेही अनेक पक्ष आपले राजकीय भवितव्य ठरविण्यासाठी व जनसामान्यांमधील राजकीय अस्तित्वाचा अंदाज घेण्यासाठी निवडणूक रिंगणात उतरले आहेत. राष्ट्रीय पक्ष हाताच्या बोटावर मोजण्याइतपत प्रभावी असले, तरी प्रादेशिक पक्षांचे महत्त्व नाकारून चालणार नाही. प्रादेशिक पक्षांचे उपद्रवमूल्य लक्षात घेऊनच राष्ट्रीय पक्षांना मतांची मोट बांधण्यासाठी त्या त्या राज्यांमध्ये प्रभावी असणारी प्रादेशिक पक्षांशी युती व आघाडी करावी लागलेली आहे. अगदी 'अब की बार चार सौ पार' असा नारा देणाऱ्या भाजपालाही त्या त्या राज्यांतील प्रादेशिक पक्षांना गोंजारत जागावाटपात स्थान द्यावे लागले आहे. गुजरात, उत्तर प्रदेश यांसारख्या राज्यांमध्ये भाजपाचा प्रभाव असल्याने त्या राज्यांमध्ये भाजपाला मित्रपक्षांवर तसेच त्या त्या राज्यातील अन्य प्रादेशिक पक्षांच्या कुबड्यांची गरज लागणार नाही. असे असले तरी मतविभागणीचा धोका नको व चार-दोन जागांवर राजकीय फटका बसू नये यासाठी मोर्चेबांधणी करताना उत्तर प्रदेशात प्रभाव असताना तेथील प्रादेशिक पक्षांचाही विचार करण्याचा समंजसपणा भाजपाने दाखविला आहे.मुळातच ही लढत खऱ्या अर्थाने भाजपा व काँग्रेस या दोन पक्षांतच प्रामुख्याने असून अन्य पक्ष आपल्या सोयीनुसार आपल्या राजकारणाची दिशा ठरवत भाजपा व काँग्रेसच्या बाजूने निवडणूक रिंगणात सहभागी झाले आहेत. लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यात भाजपा व मित्रपक्षांचा आक्रमक प्रचार सुरू असताना तुलनेने काँग्रेस व मित्रपक्षांकडून आक्रमक प्रचाराला सुरुवात झालेली नाही. महाराष्ट्रापुरता विचार करावयाचा झाल्यास भाजपाची महायुती आणि उबाठा, शपगच्या जोडीने काँग्रेसने महाविकास आघाडीची निर्मिती केलेली आहे. अन्य निवडणुकांच्या तुलनेत ही निवडणूक वेगळी असल्याने प्रत्येक मतदारसंघातील उमेदवार ठरविण्यासाठी मविआ आणि महायुतीला विचार करूनच आडाखे बांधावयास लागत आहेत. त्यातच ठाणे, बारामती, अमरावती, सातारा, कोल्हापूर, सांगली, मुंबईतील मतदारसंघ, कोकणातील मतदारसंघ, नागपूर या ठरावीक मतदारसंघातील घडामोडींनी महायुती व मविआचे टेन्शन काही प्रमाणात वाढविले आहे.अर्थात स्वबळावर तसेच एकला चलो रेची भूमिका घेत निवडणुका लढविणाऱ्या पक्षांपुढे तशी समस्या निर्माण होत नाही; परंतु आघाडी तसेच महायुती करून निवडणुका लढविणाऱ्यांना मित्रपक्षांचाही प्रामुख्याने विचार करावा लागत आहे. आपल्या पक्षांतील इच्छुकांचे रुसवे-फुगवे काढण्याबरोबर मित्रपक्षांकडून केले जाणारे दावे, त्या त्या मतदारसंघात असणारी आपली व मित्रपक्षांची राजकीय ताकद या सर्व बाबींचे तिकीट वाटप करताना अवलोकन करावे लागते. त्यामुळेच त्या जागेवर विद्यमान खासदार कोणत्या पक्षाचा आहे, याचा विचार न करता आजच्या सर्व्हेमध्ये त्या खासदाराची लोकप्रियता किती आहे, पुन्हा निवडून येण्याची क्षमता आहे का, विरोधी पक्षांतून कोणाला उमेदवारी देण्यात आली आहे, त्या तुलनेत आपला उमेदवार तुल्यबळ आहे का, निवडून येऊ शकेल या सर्व बारीक सारीक गोष्टींचा विचार या सर्व निवडणुकीत मविआ तसेच महायुतीकडून करण्यात येत आहे. त्यामुळेच दोन्ही गटांकडून उमेदवार जाहीर करण्यास विलंब होत असून जोपर्यंत उमेदवारीची घोषणा होत नाही, तोपर्यंत विद्यमान खासदारांनीही आपल्या घरातील देव पाण्यात ठेवले असल्याचे यंदा प्रथमच महाराष्ट्राच्या राजकारणात पाहावयास मिळत आहे.सहसा विद्यमान खासदारांचे तिकीट कापले जात नाही. खासदारांचे निधन झाले असल्यास अथवा जनसामान्यांत अकार्यक्षम ठरला असल्यास अथवा भ्रष्टाचार तसेच अन्य गुन्ह्यात अटक झाली असली तरच विद्यमान खासदारांना तिकीट नाकारली जात असते; परंतु यंदा तसे काहीही नसले तरी मविआ आणि महायुतीकडून प्रथमच तिकीट वाटपात चोखंदळ भूमिका घेतली गेल्याने प्रस्थापितांसह व तिकीट मिळविण्यासाठी मातब्बर असलेल्या इच्छुकांमध्ये तिकीट मिळाल्याची घोषणा होईपर्यंत घालमेल सुरूच असते. यंदा तर जाहीर झालेले उमेदवार बदलण्याची घटना घडलेली आहे.*

# मानवता रुजविणारे विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर



माणूस जन्माला येतो तेव्हा तो एक पवित्र जीव असतो. त्या पवित्र जीवावर लहान वयात सर्वच जाती धर्माचे प्रेम करतात. जेव्हा सर्व धर्माचे जातीचे त्या पवित्र लहान जीवाचे लाड पुरवतात तेव्हा त्या पवित्र जीवाला हे संपूर्ण विश्व किती चांगले आहे आणि किती चांगले लोकं आहेत हे त्याला वाटू लागतं. परंतु तो जसा जसा मोठा होतो तस तसे त्यावर समाजाचे संस्कार होत असतात. त्याला लहानपणीचा अनुभव व मोठे होण्याचा अनुभव हा वेगळा जाणवत असतो. अशाच ह्या माणसाच्या जीवन चक्रातून महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा जन्म झाला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना जन्मा पासूनच जातीय व्यवस्थेचे चटके सोसावे लागले. वर्गाच्या बाहेर शिक्षण घ्यावे लागले. काय वाटले असेल त्या कोमल जीवाला. एकाला एक न्याय दुसऱ्याला एक न्याय. परंतु शिकवण ही झाली होती की सर्व लेकरं देवा समान. सर्व लेकरं देवा घरची फुल. मग ह्या देवा घरच्या सर्व समान लेकरांना हा वेग वेगळा न्याय का ? किती द्वंद्व चालले असेल ह्या लहानशा डॉ. बाबासाहेबांच्या मनामध्ये.आपण संपुर्ण डॉ. बाबासाहेबांचे जीवन बघितले तर त्यांनी हाल व अपमान सहन केले. एव्हडी विद्वत्ता असून सुद्धा का अपमान सहन करायचा ? ह्या विचाराने किती त्यांना त्रास झाला असेल. ह्या समाजातील एव्हढी विदरक्ता बघून किती त्यांना त्रास झाला असेल. परंतु हा बदल झाला पाहिजे माणूस म्हणून माणसाला माणूसपण मिळाले पाहिजे केव्हढा मोठा विचार. हा समाज जरी माझ्या सोबत वाईट वागला तरी मी ह्या समाजाचे कल्याण करीन. त्यांनी द्वेषाचे उत्तर प्रेमाने दिले. किती मोठे तत्त्वज्ञान. तुम्ही आम्हाला कुचला, तरी आम्ही उभारी मारू, किती मोठी जिद्द, किती मोठा आत्मविश्वास. अनुकूल परिस्थिती असताना प्रगती करणे वेगळे परंतु प्रतिकूल परिस्थितीत संघर्ष करून समाजासाठी जीवन जगणे वेगळे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शिक्षना शिवाय काही दुसरा प्रगतीचा मार्ग नाही हे ओळखले होते. म्हणून त्यांनी अहोरात्र अभ्यास केला. एकदा तर इंग्लंडच्या ग्रंथालयात ते अभ्यास करीत असताना ग्रंथपाल एक दिवस त्यांना ग्रंथालय बंद करतांना सांगायचे विसरून गेला. दुसऱ्या दिवशी जेव्हा ग्रंथालय उघडले तर आश्चर्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर वाचण्यात मग्न होते.ते जेव्हा पुस्तक वाचत तेव्हा दिवस रात्र विसरून जात. केव्हढी ही अभ्यासाविषयी गोडी. सर्व विद्यार्थ्यांना ही प्रेरणादायी ठरणारी आहे.

डॉ. बाबासाहेब हे खऱ्या अर्थाने मानवतावादी होते. अगोदरचा काळ तर जाऊच द्या ह्या तंत्रज्ञाच्या युगात सुद्धा मणिपूर सारख्या घटना घडतात. स्त्रियांना अपमानित केले जाते. २४ फेब्रुवारी १९४९ ला संसदेत हिंदू कोड बिल मांडले. काय होते हे हिंदू कोड बिल ? तर ह्या हिंदू कोड बिलामुळे स्त्रियांना सन्मान मिळणार होता. ह्यात बहुपत्नीला नकार, घटास्पोटा नंतर पोटगीचा अधिकार, स्त्रियांना समान वारसा हक्क. हे हिंदू कोड बिल काही विशिष्ट समाजासाठी नाही तर भारतातील संपूर्ण स्त्रियांसाठी होते. केव्हढी ही मानवता.

सर्व कामगारांना योग्य न्याय मिळाला पाहिजे म्हणून कामाचे तास ठराऊन देणे. सर्वांना बोनस मिळावा यासाठी कायद्यात तरतूद. पी. एफ., ग्रॅच्युइटी चा अधिकार प्राप्त करून दिला. सर्व कामगारांना ह्यामुळे न्याय मिळाला व त्यांचे जीवन सुरळीतपणे पार पडले व पडत आहे. केव्हढी ही महानता व मानवता. स्त्रियांना भर पगारी प्रसूती रजा मिळऊन दिली. ह्याचा अगोदर कोणी विचार सुद्धा केला नाही. केव्हढी ही महानता. परंतु दुःख ह्याचे आहे की, स्त्रियांना याची जाणीव नाही आणि आपणहून जाणीव करून घेण्याचा कोणी प्रयत्न सुद्धा करून घेत नाही.

शेतकरी जो देशाचा कणा असतो. कृषी उत्पन्नावर त्या देशाची प्रगती ठरत असते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शेतकऱ्यांना त्यांचा न्याय हक्क मिळावा म्हणून आंदोलन केले. शेतकऱ्यांचा संप करणारे ते पाहिले पुढारी ठरले. शेतकरी हे सर्व धर्माचे व जातीचे असतात यांच्या सर्वांच्या न्याय हक्कासाठी ते लढले.

ह्या जगा मध्ये सर्वात जास्त संघर्ष व जीवितहानी झाली असेल तर ती म्हणजे धर्माच्या नावावर. जगामध्ये लाखो जणांचे प्राण ह्या धर्मासाठी गेले. परंतु डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सर्व धर्माचा अभ्यास केला एव्हढेच नाही तर त्यांना सगळ्याच धर्माचे निमंत्रण सुद्धा होते. परंतु डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शांतीचा मार्ग देणारा मुळ भारतीय बौद्ध धर्म स्वीकारला. ज्यामध्ये भगवान बुध्दांनी वैज्ञानिकदृष्टिकोन मार्गाचा उपदेश सुद्धा दिला. किती मोठी ही मानवता. धर्म परिवर्तन म्हणजे सोपे नाही. ते ही त्याकाळी ज्यावेळी सगळे समाज बांधव हे जास्त प्रमाणात सुशिक्षित नव्हते. त्यांना योग्य दिशा देणे, धर्म परिवर्तन हे काही सोपे काम नाही. धर्मासाठी रक्ताचे पाट वाहिले आहेत. किती जणांना विश्वात आहुती मिळाली आहे. गुदमरून चेंबर मध्ये त्यांना प्राण द्यावे लागले. परंतु डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी रक्ताचा एक थेंब ही ना सांडवता एव्हढे मोठे धर्म परिवर्तन केले. कुठल्याही प्रकारची जीवितहानी होऊ दिली नाही. केव्हढी मोठी ही मानवता.

सर्वात मोठे उपकार डॉ. बाबासाहेबांचे आपल्या भारतीयांवर आहे ते म्हणजे त्यांनी लिहिलेली राज्य घटने मध्ये सर्वांना समान अधिकार देण्यात आला आहे. खरी लोकशाही जिवंत ठेवण्याचे व रुजविण्याचे काम संविधानाने केले आहे. ह्यात अभियक्ती स्वतंत्र आहे. आपण आपले म्हणणे, विचार व्यक्त करू शकतो. आपल्या न्याय हक्कासाठी झगडू शकतो. हे अभियक्तती स्वतंत्र व न्याय हक्क हे सर्व भारतीयांसाठी आहेत. कोणीही आपली मनमानी करू शकत नाही. केव्हढी मोठी ही मानवता सर्वांना समान न्याय देणे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी तेव्हा नद्या जोडण्याचा ठराव मांडला होता. उद्देश हाच होता की, सर्वांना व शेतीला मुबलक पाणी मिळावे. आज पाण्याची कमतरता काही भागा मध्ये आपल्या देशात भासू लागली हा विचार त्यांनी त्याकाळी केला होता केव्हढी ही महानता.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मानव हा संपुर्ण विश्वाचा केंद्र बिंदू आहे हे समजले होते. मानवाचा विकास होणे, त्याला संपुर्ण संधी देणे, त्याला न्याय देणे हा मूलमंत्र दिला. आपसा आपसातील वैर संपविणे व गुण्या गोविंदाने सर्व देशवासीयांनी राहणे हा मूलमंत्र संविधानाने दिला. गरज ही होती की हा मूलमंत्र रुजविणे, लोकशाही अधिक मजबूत करणे. परंतु आज ह्यावर आक्रमण होतांना दिसत आहे. आपण वेळीच जागे झाले पाहिजे नाही तर डॉ. बाबासाहेबांनी जे हक्क आपण सर्वांना संविधान द्वारे मिळऊन दिले ते आपण गमावून बसू.

मानव कल्याणासाठी भारतरत्न डॉ बाबासाहेबांचा विचार सर्वांपर्यंत पोहचू या ह्या विचार धारेने भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकरांची जयंती साजरी करू या. डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या हार्दिक शुभेच्छा. जयभीम जय भारत.



**-अरविंद मोरे,**
**नवीन पनवेल**
**मो. ९८२०८२२८८२.**

# कुठलीही नाराजी न ठेवता महायुतीच्या उमेदवार राजश्री पाटील यांचा प्रचार करणार : भावना गवळी

वाशिम : यवतमाळ वाशिम मतदार संघाचे नेतृत्व करणाऱ्या शिवसेनेच्या विद्यमान खा भावना गवळी यांना २०२४ लोकसभा निवडणूकीसाठी यवतमाळ वाशिम मध्ये उमेदवारी देण्यात आली नाही त्यामुळे त्या गेल्या दहा दिवसापासुन नॉटरिचेबल होत्या. राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत माजी मंत्री अर्जुन खोतकर या शिवसेना शिंदे गटाच्या नेत्यांनी भावना गवळी यांच्या निवासस्थानी जावुन आपण महायुतीच्या उमेदवारसाठी प्रचारात सक्रीय व्हाव हा मुख्यमंत्री एकनाथा शिंदे यांचा निरोप घेवुन गेले होते. मुख्यमंत्री एकनाथ शिदे याच्याशी



चर्चा झाल्यानंतर खा भावना गवळी यांनी वाशिम येथील जनसंपर्क कार्यायात पत्रकार परिषद घेवुन महायुतीच्या उमेदवार राजश्री पाटील यांचा प्रचारा करणार असल्याचे सांगितले. पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नाला त्यांनी आपण तिकीट न दिल्यामुळे नाराज नाही मात्र पाचवेळा या मतदार संघाचे नेतृत्व केल्यावरही माझ तिकीट कापल याची खंत आहे शेवटी पक्ष म्हटल तर संघर्ष असतो मात्र मुख्यमंत्र्यांनी बहीण म्हणुन अन्याय होवु देणार नाही अशी ग्वाही दिली त्यामुळे त्याचावर विश्वास ठेवुन आपण या लोकसभा निवडणूकीमध्ये मी व माझे सर्व पदाधिकारी कार्यकर्ते आमचरू उमेदवाराच्या प्रचारसाइअी कुठे कमी पडणार नाही त्यांना नककीच निवडूण आणु अशा त्या महणाल्या. महायुतीचा मित्रपक्ष असलेल्या भाजपाने तुमचे उमेदवारी कापली आज ते मित्रपक्ष भाजपला तुम्ही महायुतीच्या उमेदवाराचा प्रचार करावा असा नेमका काय साक्षातकार भाजपाला झाल असा प्रश्न पत्रकारांनी केला. त्या पुढे म्हणाल्या त्यावर मी काही बोलणार नाही मात्र गेल्या २५ वर्षात या मतदार संघाच्या विाकसासाठी कुठेही कमी पडले नाही माझे वडील स्व. माजी खा. पुंडलीकराव गवळी यांच्या प्रयत्नाने वाशिम जिल्हा झाला हे जनतेला सागण्याची गरज नाही. गवळी घराण्याचे या मतदार संघाच्या व जिल्हयाच्या विकासाठी मोठे योगदान आहे.

# पाणी नाही,वीज नाही, रोजगार नाही... जगायचं कस ...!

## उतावली येथील ग्रामस्थांनी मांडल्या बळवंत वानखडे समोर समस्या

धारणी : अमरावती लोकसभा मतदार संघाचे उमेदवार बळवंत वानखडे यांचा मेळघाटात दौरा सुरू असतांना उतावली येथील ग्रामस्थांनी संवाद साधतांना येथील ग्रामस्थांनी आमच्याकडे पाणी नाही, वीज नाही, रोजगार नाही अश्या अनेक तक्रारींचा पाढा वाचत आम्ही जगायचे कसे असा प्रश्न उपस्थित केला. मेळघाटातील अनेक ठिकाणी या मूलभूत समस्या असून बळवंत वानखडे यांनी आपण नक्कीच समस्यांचे निराकरण करू असे ओशासन नागरिकांना दिले. गावातील वीज कर्मचारी दारू पिऊन गावात पडला असतो तसेच गावातील तलाठी हे सुद्धा गावकऱ्यांसोबत असभ्य भाषेत बोलतात त्यामुळे एकप्रकारे



आदिवासी नागरिकांवर अन्याय होत असल्याची तक्रार येथील नागरिकांनी करताच बळवंत वानखडे यांनी प्रचार थांबवून वीज कर्मचारी व तलाठी यांचा समाचार घेतला. बळवंत वानखडे यांचा मेळघाटात जोरदार प्रचार सुरू असून मातीतला एकनिष्ठ आणि हक्काचा माणूस असल्याने गावकऱ्यांमध्ये त्यांच्याविषयी स्नेह वृद्धिंगत होत असून मेळघाटातील युवा वर्ग, अबालवृद्ध,महिला भगिनी बळवंत वानखडे यांच्या पाठीशी भरभक्कमपणे असल्याचे जाणवत आहे. मेळघाटमधील प्रचार दौऱ्यामध्ये महाविकास आघाडीचे सर्वच पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्ते एकजुटीने प्रचार कार्य करत असून मेळघाटातील नागरिकांनी बळवंत वानखडे यांना विजयी करण्याचा संकल्प केला आहे. या प्रचार दौऱ्यात सर्व गावकरी मंडळी, महाविकास आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. कुसुमकुंड बुद्रुक येथे बैठक यावेळी बळवंत वानखडे व महाविकास आघाडीचे सर्व पदाधिकारी,कार्यकर्ते यांची कुसुमकुंड याठिकाणी बैठक पार पडली.बैठकीमध्ये बळवंत वानखडे यांनी नागरिकांशी संवाद साधत त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. यावेळी बैठकीलासरपंच प्रेमलता भिलावेकर,माजी सभापती दयाराम काळे, मन्ना दारसिबे,राम चव्हाण व गावातील प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते धारणी येथे महाविकास आघाडीचा मेळावा महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार बळवंत वानखडे यांच्या प्रचारार्थ धारणी येथे पदाधिकारी व कार्यकर्त्यांचा मेळावा आयोजित करण्यात आला होता. या मेळाव्याला नागरिकांची सुद्धा लक्षणीय उपस्थिती होती.आदिवासी बांधवांची हक्काची लढाई लढण्यासाठी महाविकास आघाडी सज्ज असून यापुढे मेळघाटातील कोणत्याही आदिवासी बांधवांवर अन्याय होणार नाही अशी ग्वाही यावेळी बळवंत वानखडे यांनी दिली.

## ईव्हिएमच्या वाहनांना लागणार जीपीएस ट्रॅकर

अमरावती : लोकसभेच्या निवडणुकीच्या तयारी अंतिम टप्प्यात असुन निवडणुक विभागाकडुन रवीवारी ४ हजार ७०८ ईव्हिएमची सळमिसळ करून लगेच सदरचे इव्हिएम विधानसभानिहाय पाठविले जाणार आहे.ईव्हिएमच्या सुरक्षतितेकरीता या वाहनांना जीपीएस लावले जाणार आहे.त्यामुळे सदरचे वाहन कोठून कोठे जात आहे. यावर प्रत्यक्ष जिल्हाधिकारी यांची नजर राहणार आहे.लोकसभेकरीता २६ एप्रिल रोजी मतदान होवु घातले आहे. जिल्ह्यात २६७२ मतदान केंद्रांवर मतदान होणार आहे. अमरावती लोकसभेकरीता ३७ उमेदवार रींगणात असल्याने एका केद्रांवर प्रत्येकी तीन ईव्हिएमची गरज भासणार आहे.त्यामुळे निवडणुक विभागाकडुन २६०० ईव्हिएमची आयात करण्यात आली आहे.सद्यास्थिती ४ हजार ७०८ ईव्हिएम उपलब्ध असल्याने याचे सळमिसळ रवीवारी होणार आहे. सकाळी ११ वाजतापासुन ही प्रक्रिया सुरू होणार आहे.सकाळभ तांत्रिक प्रक्रियेनंतर फिजीकल प्रक्रिया ईव्हिएमवर केली जाणार आहे.त्यामुळे या प्रक्रियेकरीता उमेदवारांना देखील बोलाविण्यात आले आहे.त्यांच्या समक्ष ही प्रक्रिया केली आहे.त्यानंतर सदरचे ईव्हिएम विधानसभानिहाय पाठविले जाणार आहे.

# येत्या २४ तासात मुसळधार पाऊस कोसळणार; अमरावतीसह विदर्भात अलर्ट

अमरावती :लोकसभा निवडणूक तोंडावर आली असताना आणि प्रचार जोरात सुरु असताना वादळी तांडव आणि अवकाळी पावसाचा जोर वाढला आहे. प्रामुख्याने अमरावतीसह विदर्भात बहुतांश जिल्ह्यात अवकाळी पावसाने धुमाकूळ घातला आहे. दरम्यान, येत्या २४ तासात पुन्हा एकदा अमरावतीसह यवतमाळ, अकोला,वाशिम, बुलढाणा जिल्ह्यात वादळी वाजयासह विजांच्या कडकडाटात मुसळधार पाऊस कोसळण्याची शक्यता भारतीय हवामान खात्याने सांगितले आहे. संपूर्ण आठवडा वादळीवारा आणि गारपिटीसह राज्यातील अनेक जिल्ह्यात अवकाळी पावसाने हजेरी लावली. तर आठवड्याची सुरुवात सुद्धा मुसळधार पावसानेच होणार आहे. विदर्भात अमरावती, नागपूरसह अकोला, बुलढाणा, वाशिम, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया, वर्धा, यवतमाळ या जिल्ह्यांना पावसाचा 'अलर्ट' दिला आहे. आठवड्याभरापासूनच कोसळणाजया अवकाळी पावसामुळे हजारो हेक्टरवरील पीकांचे नुकसान झाले आहे. तर विदर्भातला शेतकरी संकटात सापडला आहे.अमरावती जिल्ह्यात वादळीवारा आणि गारपिटीसह पाऊस झाल्याने शेतपिकांचे तसेच घरांचे नुकसान झाले. लोकसभा निवडणूकीचा प्रचार शिगेला पोहोचला असताना शेतकरी आणि सर्वसामान्य नागरिक मात्र अवकाळी पावसामुळे त्रस्त झाले आहेत. प्रामुख्याने अमरावतीसह विदर्भातील अनेक जिल्ह्यात अवकाळीचे संकट कोसळले आहे. तर भारतीय हवामान खात्याने आठवड्याची अखेरही पावसानेच होणार असल्याचे सांगितले आहे. खात्याने वर्तवलेल्या अंदाजानुसार दक्षिण कोकण आणि मध्य महाराष्ट्राच्या जिल्ह्यांमध्ये तुरळक ठिकाणी, मराठवाडा आणि विदर्भाच्या जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी विजांच्या कडकडाटासह वादळ, सोसाट्याच्या वाऱ्यासह मुसळधार पाऊस येण्याची शक्यता आहे.

# बाबासाहेबांनी संविधानातून दिले पंचशील

## ॲड.आनंद गायकवाड यांचे प्रतिपादन : चांदूर रेल्वेत भीम जयंती उत्सवाचे उद्घाटन





चांदूर रेल्वे : डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी कलम १२ ते ३५ मध्ये नागरिकांना मुलभुत अधिकार दिले आहे.त्यामध्ये स्वातंर्त्याचा अधिकार,समानतेचा अधिकार,शोषण विरूध्दचा अधिकार, सांस्कृतिक अधिकार व शैक्षणिक अधिकार असे पंचशिल संविधानाच्या माध्यमातुन दिले. या अधिकाराचा भंग होवु नये यासाठी कलम ३२ चे कवच दिले असे प्रतिपादन सुप्रसिध्द कवि, साहित्यीक ॲड.आनंद गायकवाड यांनी केले. येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती समितीच्यावतीने स्थानिक मुलगंधकुटी बुद्धविहार येथे आयोजित 'भीमजयंती उत्सव-२०२४'चे उद्घाटक म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी प्रशांत धम्म ज्योती संघाचे अध्यक्ष महादेव दुर्योधन व उद्घाटक म्हणुन प्रसिध्द कवि,साहित्यीक ॲड.आनंद गायकवाड, प्रमुख अतिथी म्हणून साहित्यिक प्रा.संजय घरडे, डॉ.रवींद्र खंडारे, राजू गुडधे,रामचंद्र उबाळे, अरविंद खंडारे आदी मान्यवर उपस्थित होते. भगवान गौतम बुध्द,डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे पुतळ्यांचे व महात्मा फुले यांच्या प्रतिमेचे पुजन करून व त्रिशरण,पंचशिल ग्रहण करून कार्यक्रमाची सुरूवात झाली. यावेळी बोलतांना आनंद गायकवाड म्हणाले,ामन संस्कृती व ब्राम्हणी संस्कृती मधील संघर्ष फार पुरातन काळापासुन आहे. महार हे मार्शल रेश योध्दांचे वंशज असुन लढणारी जमात असल्याचं बाबासाहेब म्हणायचं. शिशुनागपाल पासुन ते तक्षक,करकोटक,शेषनाग या नागांचे आम्ही वंशज आहोत.नांगवंशीयांनी बुध्दाला सौरक्षण दिले, बुध्दाच्या धम्माचा प्रचार व प्रसार केला.एका लढाईत नागवंशीय पराभूत झाले आणि पराभूत झाल्यानंतर इथल्या ब्राम्हण धर्मियांनी आम्हाला शेवटचे वर्ण द्यायचे कबुली दिली. पण आम्ही वर्ण स्विकारला नाही. आम्ही या वर्ण व्यवस्थेत सामील झालो नाही म्हणून आम्हाला अस्पृश्य केल्या गेले.

आम्हाला गावाच्या बाहेर ठेवण्यात आले ही वस्तुस्थिती आपण समजुन घेतली पाहिजे.बुध्दाचा जेव्हा उदय झाला.बुध्द,त्यांचा धम्म,आणि संघ हे आपल्या समोर त्रिरत्न आहेत. बुध्द हे तत्ववेत्ता मार्गदर्शक असुन, त्यांनी मी मोक्षदाता नाही, तर मी मार्गदाता आहे हे सांगीतले. मी सांगतो त्या मार्गाने चाला असे त्यांनी सांगीतले.संघानं एकात्मता,स्वातंत्र्य,मत मांडण्याची संधी दिली.भगवान बुध्दानं ज्या मंचावर ब्राम्हणं बसायचं त्यांच्या तोडीला स्त्रीयांना आनलं.त्यांच्या तोडीला उपाली सारखा न्हावी व सुनित सारखा भंगी समाजाचा पोरगा आणुन खालच्या वर्गाला एका समान पातळीवर तथागताने आनल्याचे श्री गायकवाड यांनी सांगीतले. यावेळी प्रा.संजय घरडे,डॉ.रवींद्र खंडारे व महादेव दुर्योधन यांची समयोचित भाषण झाले. प्रास्ताविक प्रा.प्रसेनजित तेलंग यांनी केले.तर संचालक जिया वाकोडे हीने केले. यावेळी मोठ्या संख्येने आंबेडकरी समाज बांधव-भगिनी उपस्थित होत्या.

# इंडस्ट्री कोणाच्या बापाची नाही, नेपोटिझमवर विद्या बालनचं स्पष्ट विधान

*बॉलीवूडमध्ये स्वतःचं स्थान निर्माण करायला कलाकारांना प्रचंड मेहनत करावी लागते. त्यातही नवखा कलाकार असेल तर त्याला इथे काम मिळवण्यासाठी करावा लागणारा संघर्ष चुकत नाही. विद्या बालन आणि प्रतीक गांधी यांनी इंडियन एक्स्प्रेस 'एक्सप्रेसो' मालिकेच्या पहिल्या भागात हजेरी लावली. त्यांनी या मुलाखतीत अनेक प्रश्नांची उत्तरं दिली. इंडस्ट्रीत यशस्वी होण्याआधी कामासाठी पचवलेले नकार, ऐकावे लागलेले टोमणे याबद्दलही त्यांनी सांगितलं.सिनेसृष्टीतील नेपोटिझम हा कायम चर्चेत राहणारा विषय आहे. फिल्म इंडस्ट्रीमध्ये पक्षपातीपणा अनुभवयाला मिळाला का, असा प्रश्न विद्या बालनला विचारण्यात आला. नेपोटिझम असो किंवा नसो, मी इथे आहे. इंडस्ट्री कोणाच्या बापाची नाही, तसं असतं तर आज प्रत्येक बापाचा मुलगा आणि प्रत्येक बापाची मुलगी यशस्वी असते (सर्व स्टार किड्स यशस्वी झाले असते), असं स्पष्ट उत्तर विद्या बालनने दिलं.प्रतीकने त्याची इंडस्ट्रीतील सुरुवात ते यशापर्यंतचा त्याचा प्रवास सांगितला. सुरतहून मुंबईत आल्यानंतर त्याला खूप संघर्ष करावा लागला. टीव्हीवर मला रिजेक्ट केलं गेलं. मी दिलेल्या सर्व ऑडिशन्समध्ये मला नकार मिळाला. त्या निर्मात्यांची टेलिव्हिजन शोसाठी अभिनेत्याची कल्पना थोडी वेगळी होती. मी त्यात फिट बसत नव्हतो. ते विशिष्ट शरीरयष्टीचे, विशिष्ट त्वचेचा रंग असलेले आणि एक विशिष्ट लूक असलेले अभिनेते शोधत होते, असं प्रतीक म्हणाला.बालनने तिच्या करिअरच्या सुरुवातीच्या काळात झालेल्या त्रासाबद्दल सांगितलं. मी तीन वर्षे हार्टब्रेकमधून जात होते. सारखे नकार मिळत होते आणि त्यामुळे मला त्रास होता. मी अक्षरशः उद्ध्वस्त झाले होते आणि या क्षेत्रात पुढे जाण्याची माझी इच्छा होत नव्हती. पण माझ्या मनात काहीतरी करायची आग होती जी या सर्व नकारांपेक्षा मोठी होती, असं विद्या म्हणाली. विद्या आणि प्रतीक यांनी 'दो और दो प्यार' या चित्रपटात एकत्र काम केलं आहे. यात त्यांनी एका विवाहित जोडप्याची भूमिका केली आहे. यात इलियाना डिक्रूझ आणि सेंधील राममूर्ती यांच्याही भूमिका आहेत. चित्रपट १९ एप्रिलला प्रदर्शित होणार आहे.*



# कोणत्याही स्थितीत आरक्षणाला धक्का लागणार नाही : अमित शाह



जयपूर: पंतप्रधान नरेंद्र मोदी स्वतः आरक्षणाचे सर्वात मोठे समर्थक असून कुठल्याही परिस्थितीत दलित, आदिवासी आणि इतर मागासवर्गीयांच्या आरक्षणाला धक्का लागणार नसल्याची ग्वाही केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी शनिवारी दिली. आम्ही आरक्षण संपुष्टात आणणार नाही आणि अन्य कोणाला ते करू देणार नाही. काँग्रेस यासंदर्भात खोटे बोलत लोकांची दिशाभूल करत आहे, असा आरोप शाह यांनी लावला. त्याचबरोबर राम मंदिर, कलम ३७० आणि । ओबीसीच्या मुद्यावरून त्यांनी काँग्रेसवर सडकून टीका केली.

राजस्थानच्या अलवर जिल्ह्यातील हरसोलीमध्ये एका निवडणूक सभेला संबोधित करताना अमित शाह यांनी, भाजप हा आरक्षणाचे समर्थन करणारा पक्ष असल्याचा दावा केला. भाजप आरक्षण संपुष्टात आणणार असल्याची चुकीची माहिती काँग्रेसकडून विशेषतः दलित आणि आदिवासींमध्ये पसरविली जात आहे. पण आरक्षण हे दलितांचे असो, आदिवासींचे असो की इतर मागास वर्गीयांचे असो, भाजप कुठल्याही स्थितीत आरक्षणाला धक्का लावणार नाही आणि कोणाला लावू देणार नाही. मोदी स्वतः आरक्षणाचे सर्वात मोठे समर्थक आहेत, असे शाह म्हणाले. उलट काँग्रेस ओबीसीविरोधी पक्ष असल्याची टीका त्यांनी केली. काँग्रेसने ओबीसींवर अनेक वर्षांपर्यंत अन्याय केला. काका कालेकलर आणि मंडल आयोगाचा अहवाल दाबून ठेवला, असा आरोप शाह यांनी केला. तर मोदींनी सत्तेत आल्यानंतर ओबीसी आयोगाला घटनात्मक दर्जा दिला. केंद्रातील सर्व भरतींमध्ये ओबीसी समाजाला २७ टक्के आरक्षण देण्याचे काम मोदींनी केल्याचा दावा शाह यांनी केला. मोदी स्वतः ओबीसी समाजातून येतात आणि त्यांच्या मंत्रिमंडळात

२७ हून अधिक ओबीसी मंत्री आहेत, असे स्पष्ट करत शाह यांनी पुन्हा एकदा मोदींना सत्ता देण्याचे आवाहन केले. गत १० वर्षात मोदींनी अशक्य वाटणारी असंख्य कामे केली आहेत. या कामाचे रेकॉर्ड मोदींकडे असून, पुढच्या २५ वर्षांची योजनादेखील त्यांच्याकडे असल्याचा दावा शाह यांनी केला, काँग्रेसने ७० वर्षापर्यंत राम मंदिराचा मुद्दा लटकवून ठेवला. पण दुसऱ्यांदा पंतप्रधान झाल्यानंतर मोदींनी राम मंदिराचा मुद्दा मार्गी लावला. यंदा १७ तारखेला सव्वापाचशे वर्षांनंतर रामलल्ला भव्य मंदिरात आपली जयंती साजरी करतील, असे शाह म्हणाले. एकीकडे मोदी 'बेटी बचाओ-बेटी पढाओ' म्हणतात तर दुसरीकडे काँग्रेस 'बेटा बचाओ-पीएम बनाओ' म्हणत असतो, अशी टीका शाह यांनी केली.

सोनिया गांधींचे संपूर्ण लक्ष हे राहुल गांधींना पंतप्रधान बनविण्यावर आहे. राहुल गांधी असे यान आहेत, ज्यांना २० वेळा लॉंच केल्यानंतर देखील ते अपयशी ठरले आहेत. राहुल गांधींना पुढे आणताना आज पूर्ण काँग्रेस पक्ष मागे पडल्याची टीका शाह यांनी केली.






# हल्लेखोर तीन रेती माफियांना अकोल्यातून अटक



अमरावती : अवैध रेती माफियांनी १० एप्रिलला येवदा पोलीस ठाण्याच्या हद्दीत तक्रारकर्त्यावर चाकू हल्ला करून त्यांची हत्या करण्याचा प्रयत्न केला तसेच सोन्याची चैन, अंगठी देखील लुटली होती. याबाबत समांतर तपास करित एलसीबीने तिन्ही हल्लेखोर आरोपींना अकोला येथून अटक केली. शोहेब खान शकील खान पठाण (२८), दिपक उर्फ लारा भाऊराव मुळे (३०), अमोल अजाबराव नेमाडे (२९) तिन्ही रा.वडनेर गंगाई असे अटकेतील आरोपीचे नाव आहे. तिघांनी लोतवाडा येथील भिमराव विठ्ठल कुजहाडे (३३) यांच्या हत्येचा प्रयत्न केला होता. शोएब हा एक कुख्यात अवैध रेतीमाफियाअसून लोकांवर दादागिरी सुध्दा करतो. शोएबच्या त्रासाला कंटाळून भीमराव १० एप्रिलला त्याच्याविरोधात तक्रार देण्यासाठी येवदा पोलीस ठाण्यात निघाले. याबाबत कळताच शोएबने दिपक व अमोल यांच्यासह मिळून त्यांना लोतवाडा बसस्टॅण्डवर पकडले. आधी शोएबने तक्रार देऊ नका, आपण दहीहांडा येथे बारमध्ये जाऊ, तुम्हाला १ लाख देतो असे भिमराव तुम्हाला १ लाख देतो असे भिमराव यांना म्हटले. भिमराव यांनी नकार देताच शोएबसह सर्वांनी त्यांना मारहाण सुरू केली आणि शोएबने खिशातील चाकू काढून भिमराव यांच्या कुशीत चाकूने सपासप वार केले. ही घटना घडताच परिसरात चांगलीच खळबळ उडाली. हल्लेखोरांनी मरणासन्न, रक्तबंबाळ अवस्थेत असलेल्या भिमराव यांच्या बोटातील सोन्याची अंगठी व गळ्यातील चैन काढून एमएच-०४-ईएस-७२७० क्रमांकाच्या हुंडाई ॲसन्ट कारने फरार झाले. याबाबत माहिती मिळताच येवदा पोलिसांनी तातडीने घटनास्थळ गाठून भिमराव यांना दर्यापुर उपजिल्हा ग्रामीण रूग्णालयात दाखल केले. या गुन्ह्याचा समांतर तपास करित एलसीबीचे पीआय किरण वानखडे यांनी तातडीने पथकासह तिन्ही आरोपींची शोधमोहिम सुरू केली. दरम्यान आरोपी अकोला येथे असल्याची माहिती मिळताच एलसीबीच्या पथकाने आज त्यांना अटक केली.












गौरव प्रकाशन वृत्तपत्र मालक, प्रकाशक, संपादक - बंडूकुमार श्रीरामजी धवणे यांनी मुद्रक गौरव बं. धवणे यांच्या अनुश्री ग्राफीक्स, चपराशीपुरा अमरावती येथे मुद्रीत करून गजानन नगर नं. १, नवीन बायपास रोड, अमरावती अमरावती-६,येथे प्रकाशित केले. मो. ९९६०२२५२७५ या पत्रातील मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (कोणताही वाद अमरावती न्याय कक्षेत) Email: gauravprakashan1@gmail.com., Website : www.gauravprakashan.com (HARD COPY B/W, PDF-COLOUR)